**साक्षीदार क्र. ६**
ची साक्ष शपथेवर सुरु

सं.फौ.प्र.५२४/२०१७
सरकार ..वि.. प्रेमिलाबाई
**नि.क्र.३३**

**नाव — ऐ.एस.आय सुनिल श्रीरंग पवार,**

वय — ५३ वर्षे, धंदा – नोकरी,

रा. – रहिमापुर, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती.

**सरतपासणी करीता सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यु.आर.वसुले यांच्यामार्फत**

१. दि.०६.०५.२०१७ मी पोलिस स्टेशन शिरजगाव कसबा येथे या पो.हे.कॉ. पदावर नेमणुकीस होतो. मी आरोपींना तसेच फिर्यादी संजय यास ओळखतो. मला गुन्हा रजिस्टर क्र.१४१–२०१७ कलम २९४, ५०६ सह ३४ नुसार दाखल या गुन्हयाचा तपास ठाणेदार साहेबांकडुन मिळाला होता. मला तपासासाठी गुन्हा रजिस्टर झाल्याबाबत छापील प्रथम खबरी अहवाल आणि लेखी रिपोर्ट प्राप्त झाला होता.

२. मी ग्राम खरपी येथे घटनास्थळ पंचनामा तयार करण्यासाठी गेलो आणि तेथे दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. घटनास्थळ हे फिर्यादी संजय याने दाखविले होते. घटनास्थळ हे खरपी गावातील सार्वजनिक रस्त्याच्या बाजुचे स्थळ होते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी आणि पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो नि.क्र.२२ वर आहे. मी फिर्यादी आणि साक्षीदारांचे बयाण नोंदविले. आरोपींना समजपत्रावर सोडले. आरोपीविरूध्द सबळ पुरावा आढळल्याने मी त्याचेविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले. आरोपींनी फिर्यादीला सार्वजनिक ठिकाणी शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तपासात निष्पन्न झाले होते.

सरतपास संपला.

**आरोपीतर्फे उलटतपास ॲड. श्री.एन.एच.पाटील यांच्यामार्फत**

३.       हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी संजय याने त्याचे घरासमोरील ठिकाण हे सार्वजनिक स्थळ आहे अगर नाही याबाबत मला माहिती दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ सार्वजनिक ठिकाण होते अगर नाही याबाबत मी चौकशी केली नव्हती. फिर्यादी आणि आरोपी यांचा पुर्वीचा दिवाणी वाद होता किंवा नाही याची मी चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरूध्द प्रबळ पुरावा नसतांना देखील मी खोटया तथ्यांच्या आधारावर आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने मला घटनास्थळाबाबत माहिती दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी आरोपीविरूध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.
फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/–**
( **एच. एस. सोनार** )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
न्यायालय क्रं. ३, चांदुरबाजार

दिनांकः– २३/०१/२०२६